**दिन विशेष...**

१८९६ : सुप्रसिद्ध कादंबरीकार र.वा. दिघे यांचा जन्म.
१८९८ : शिवराम परांजपे यांनी साप्ताहिक 'काळ' चा पहिला अंक काढला.
१९९३ : सुप्रसिद्ध लेखक मधुकर केचे यांचे निधन झाले.
१९३३ : अंतराळ संशोधक वसंतराव गोवारीकर यांचा जन्म

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७४,५३२.९६ +३२५.७२ (०.४४%)
डॉलर ₹ ९४.०१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | १८ |
| दिल्ली | ३० | १८ |
| मुंबई | ३७ | २४ |
| नागपूर | ३५ | १९ |
| पुणे | ३८ | १६ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार , दि. २५ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३३ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

प्रेम ही भाषा जगातील प्रत्येक जीव आणि प्राणी समजू शकतो

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:२९ संध्या-६:४०

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५१,६९५/- २,४५,०००/-

# धर्मांतर केल्यास अनुसूचित जातीचा दर्जा रद्द

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**हिंदू, शीख आणि बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म मानणाऱ्या व्यक्तीला अनुसूचित जातीचा सदस्य मानले जाऊ शकत नाही. त्यामुळे आंध्र प्रदेशातील एका व्यक्तीने ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यानंतर पीडित व्यक्ती अनुसूचित जाती-जमाती कायद्याच्या तरतुदींचा लाभ घेण्यास पात्र नाही. कारण ख्रिस्ती धर्मात जातिव्यवस्था नाही.**



यासंदर्भात आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दिलेला निकाल सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आणि दुसऱ्या धर्मात धर्मांतर करणारी व्यक्ती आपला अनुसूचित जातीचा दर्जा पूर्णपणे गमावेल यावर शिक्कामोर्तब केले. ३० एप्रिल, २०२५ रोजी, आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने सदर निर्णय दिला होता.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने असा निकाल दिला होता की, जर एखादी व्यक्ती ख्रिश्चन धर्म स्वीकारते आणि ख्रिश्चन श्रद्धेनुसार जीवन जगते, तर त्या व्यक्तीला अनुसूचित जातीचा सदस्य मानले जाऊ शकत नाही. मग या पाद्रीने उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल केली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, घटनात्मक आदेश, १९५० मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, कलम ३ मध्ये नमूद केलेल्या धर्मांव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर केल्यास, जन्माचा विचार न करता, अनुसूचित जातीचा दर्जा तात्काळ गमावला जातो. पीडित व्यक्तीने ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता आणि आता तो पास्टर म्हणून काम करत होता. परंतु त्याने अनुसूचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत काही व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल करणाऱ्या व्यक्तीने अनुसूचित जाती/जमाती कायद्यांतर्गत संरक्षणाची मागणी केली होती. धर्मांतर केल्यामुळे त्या व्यक्तीची मूळ सामाजिक ओळख (जातीचा दर्जा) कायदेशीररित्या संपुष्टात येते, कारण संबंधित धर्मांमध्ये (उदा. ख्रिश्चन धर्म) अधिकृतपणे जातिव्यवस्था मान्य नाही, असे कोर्टाने नमूद केले आहे.

● आनंद आणि त्यांच्या कुटुंबियांना जातीच्या नावाखाली मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. यामुळे त्यांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कायद्या अंतर्गत दाद मागितल्याचे स्पष्टीकरण दिले. न्यायालयात हे प्रकरण गेल्यानंतर आनंद यांच्या ख्रिश्चन धर्मात धर्मांतराचे कारण देत त्यांना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अंतर्गत संरक्षण मागण्याचा अधिकार गमावला असल्याचे एफआयआर रद्द करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आनंद यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

### ➢ सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटले?

न्या. प्रशांत कुमार मिश्रा आणि न्या. एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठाने म्हटले, या प्रकरणात, अपीलकर्त्याने ख्रिस्ती धर्मातून आपल्या मूळ धर्मात धर्मांतर केले आहे की नाही किंवा त्याला त्याच्या मूळ समाजाने स्वीकारले आहे की नाही, हे महत्त्वाचे नाही.उलट, पुरावे हे सिद्ध करतात की अपीलकर्ता ख्रिस्ती धर्माचे पालन करतो आणि एका दशकाहून अधिक काळ पाद्री म्हणून काम करत आहे. या तथ्यांमुळे कोणतीही शंका राहत नाही की, घटनेच्या वेळी तो ख्रिस्तीच होता.

## थोडक्यात



### राज्यातील रस्ते अपघातात ८ टक्यांनी घट

**मुंबई ।** राज्य परिवहन विभागाने राबविलेल्या विविध उपाययोजनांमुळे मुंबई, नवी मुंबईसह राज्यातील रस्ते अपघातात घट झाली आहे. जानेवारी, फेब्रुवारी या दोन महिन्यांत राज्यातील रस्ते अपघात आणि मृत्युची संख्या आठ टक्यांनी कमी झाली आहे. दरम्यान आजही मोठ्या संख्येने नागरिक विनाहेल्मेट प्रवास करीत असल्याचे आरटीओच्या कारवाईतून निर्दशनास येते. राज्याचा रस्ते अपघातात तिसरा क्रमांक लागतो.

### भोंदू बाबाच्या अंगावर तृप्ती देसाई धावून गेल्या

**नाशिक ।** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण पोलिसांनी स्थानिक पातळीवर दाबण्याचा प्रयत्न केला. स्थानिक नेत्यांनी आणि पोलिसांनी पीडितांना न्याय मिळेल, अशी कृती करणे अपेक्षित असताना प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप महिला कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला आहे. त्या न्यायालयात भोंदू खरातच्या अंगावर धावून गेल्या होत्या.

## माता, बाल आरोग्य संवर्धनासाठी राज्यात अभिनव उपक्रमांची अंमलबजावणी

प्रतिनिधी। जळगाव

**महाराष्ट्रात माता व बाल आरोग्य संवर्धनासाठी विविध अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर, नवी मुंबई येथील सिडकोच्या जागेवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र उभे राहिले आहे. या केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.श्री सत्य साई संजीवनी केंद्रामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये



राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत टू-डी-इको शिबिरांचे आयोजन करण्यात आले. (पान २ वर)

## भेसळखोरांवर 'मकोका' लावणार..!

## नरहरी झिरवाळांची विधान परिषदेत घोषणा

प्रतिनिधी । सातारा

**राज्यातील अन्नसुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी तपासणी मोहिमा अधिक व्यापक करण्यात येतील. अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंध कायदा अर्थात मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सोमवारी दिली.**

याविषयी आमदार मनीषा कायंदे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. (पान २ वर)

### ➢ चांगले दूध प्यायलो तरी पचायचे नाही



**शहरात आणि राज्यात दुधाचे पदार्थ खाण्यासही भीती वाटते, असे आमदार भाई जगताप म्हणाले. दुधापासून तयार होणारे पदार्थ खाण्यास मन धजावत नाही हे सांगतानाच, दुधातील भेसळीची इतकी सवय झाली आहे की चुकून चांगले दूध प्यायलो तर पचायचे नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. अधिकारी-पोलिस यांची यात एक मालिकाच असून त्यांच्या आशीर्वादाने भेसळीचे संगनमत असल्याचा आरोप त्यांनी केला.**

# राजस्थान रॉयल्स संघ १५ हजार कोटींत विकला

## अमेरिकन उद्योगपतीने केला खरेदी



वृत्तसंस्था । मुंबई

राजस्थान रॉयल्सच्या विक्रीचा व्यवहार अखेर १.६५ मिलियन डॉलर्सच्या विक्रमी बोलीसह पूर्ण झाला आहे. यापूर्वी राजस्थान रॉयल्सची ब्रँड व्हॅल्यू १४६ मिलियन म्हणजेच १,२६२ कोटी इतकी होती. आता ही किंमत वाढली असून फ्रँचायझीची ब्रँड व्हॅल्यू१६५ मिलियन म्हणजेच १५ कोटीच्या घरात पोहोचली आहे. अमेरिकन उद्योगपती कल सोमानी आणि त्यांच्या समूहाने या फ्रँचायझीसाठी सर्वाधिक बोली लावली होती, जी स्वीकारण्यात आली आहे.

अमेरिकेत स्थायिक असलेले उद्योजक काल सोमाणी यांनी आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स ही फ्रँचायझी खरेदी केल्याची माहिती समोर आली आहे. ही रक्कम एकरकमी दिली जाणार आहे. सोमाणी यांना वॉलमार्ट कुटुंबातील (पान २ वर)

काल सोमाणी हे अमेरिकेतील ॲरिझोनामधील स्कॉट्सडेल येथे राहणारे एक सिरीयल उद्योजक आहेत. शिक्षण-तंत्रज्ञान (ed-tech), डेटा प्रायव्हसी, AI गव्हर्नन्स आणि स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांना १५ वर्षांहून अधिक अनुभव आहे. ते IntraEdge या टेक सर्व्हिसेस कंपनीचे आणिTruyo या डेटा प्रायव्हसी प्लॅटफॉर्मचे संस्थापक आहेत. याशिवाय, AI गव्हर्नन्सशी संबंधित उपक्रमांमध्येही त्यांचा सहभाग राहिला आहे.क्रीडा क्षेत्रातही ते सक्रिय असून मोटर सिटी गोल्फ क्लबचे सह-मालक आहेत. तसेच TMRW स्पोर्ट्स आणि टीजीएल गोल्फ लीग यांसारख्या उपक्रमांमध्ये त्यांनी सुरुवातीच्या टप्प्यात गुंतवणूक केली आहे.

## शेअर बाजारात २ टक्क्यांनी वाढ

वृत्तसंस्था । मुंबई

मोजतबा खामेनी यांनी अमेरिकेसोबत चर्चा करण्यास सहमती दर्शवल्याचा दावा करण्यात आल्यामुळे, मंगळवारी प्रमुख भारतीय निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये २ टक्क्यांपर्यंतची वाढ दिसून येत आहे. पण, इराणकडून अद्याप याला कोणतीही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. आज शेअर बाजार उघडताच सेन्सेक्स सुमारे १ हजार अंशांनी तर निफ्टी ५० निर्देशांक सुमारे ३०० अंशांनी वधारल्याचे पाहायला मिळाले होते.

## कापूस खरेदीला मुदतवाढ देण्याची केंद्राकडे मागणी

### मंत्री जयकुमार रावल यांनी विधानपरिषदेत दिली माहिती

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील शेतकऱ्यांचा कापूस अधिक प्रमाणात खरेदी करता यावा, यासाठी कापूस खरेदी प्रक्रियेला आणखी मुदतवाढ देण्याची मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आल्याची माहिती मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत दिली.**

सदस्य संजय खोडके यांनी अल्प सूचना प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री जयकुमार रावल म्हणाले, सीसीआय आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून यंदाच्या हंगामात राज्यभर मोठ्या प्रमाणावर कापूस




खरेदी करण्यात आली असून, सुमारे १०,८८३ कोटी रुपयांच्या कापसाची खरेदी करण्यात आली आहे. राज्यात मागील वर्षीच्या १२८ केंद्रांच्या तुलनेत सुमारे ४० केंद्रांची वाढ करून १६८ केंद्रे मंजूर करण्यात आली, त्यापैकी १६२ केंद्रे कार्यरत होती. या केंद्रांमार्फत सुमारे १३७ लाख क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली. खरेदीची मुदत २७ फेब्रुवारीपर्यंत होती. राज्यात १५ मार्चपर्यंत मुदतवाढ मिळाली. या वाढीव कालावधीतही आणखी ९.९० लाख क्विंटल कापसाची अतिरिक्त खरेदी करण्यात आली.कापसाच्या हमीभावातही यंदा वाढ करण्यात आली. (पान २ वर)

# राजमाता जिजाऊ बस सेवेचे लोकार्पण

## एसटी महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज बसेस दाखल

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज ङ्गराजमाता जिजाऊफ या बस सेवेचा लोकार्पण सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या बस सेवेची आजपासून सुरुवात करण्यात आली.**




विधानभवन प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधामंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जॉन मॅथ्यू, टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक आदी उपस्थित होते.

एसटी महामंडळाच्या ताफ्यात यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' अशा विविध सेवांचा समावेश असून, 'राजमाता जिजाऊ' ही बस सेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर असणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम (पान २ वर)

### राजमाता जिजाऊफबस सेवा

राजमाता जिजाऊ या नावाने सुरु करण्यात आलेली ही बस सेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारी आहे. राजमाता जिजाबाई यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. राजमाता जिजाऊंच्या स्मरणार्थ ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे ३ हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

## शेळगाव बॅरेज सिंचन प्रकल्पासाठी १४०० कोटींची सुधारित मान्यता

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्याच्या शेती सिंचन प्रकल्पासाठी महत्तवपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या पुढाकारामुळे शेळगाव बॅरेज मध्यम प्रकल्पासाठी तब्बल रु. १४०७.२० कोटी रुपयांची तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.**



मंत्री गिरीश महाजन यांनी सातत्याने या संदर्भात पाठपुरावा केल्याने त्यांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरली आहे. जलसंपदा विभागाच्या या निर्णयामुळे हा महत्त्वाचा प्रकल्प पूर्ण होण्यास मदत होणार आहे. व यातून सुमारे ९१२८ हेक्टर क्षेत्र सिंचन / ओलीताखाली येणार आहे. तापी नदीवरील हा प्रकल्प यावल तालुक्यासाठी जीवनदायी ठरणार आहे. (पान २ वर)

## संपादकीय

### आत्मनिर्भर भारताचे स्वप्न!

भारतात मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादनक्षेत्राचा पाहिजे तेवढा विस्तार झालेला नाही; परंतु त्या दिशेने पावले मात्र अवश्य पडत असून, उद्योगधंद्यांना बळकटी देण्यात येत आहे. आखाती युद्धामुळे हॉटेल्स, पर्यटन, हवाई सेवा, खत अशा सर्व व्यवसायांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. शेअर बाजार व कमॉडिटी मार्केट कोसळले असून, जागतिक आर्थिक वेगाला फटका बसला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षात रेपोदरात सव्वा टक्क्याने कपात केली. आता भाववाढीचे संकट असल्यामुळे रेपोदरातील घट होण्याची प्रक्रिया थांबलेली आहे. जगाच्या तुलनेत भारतातील शेअर बाजारातील समभागांचे भाव जास्त आहेत. मात्र, आता निफ्टी आणि सेन्सेक्समध्ये झालेल्या घसरणीनंतर तशी परिस्थिती राहिलेली नाही. दुसरीकडे, भारताचे उत्पादनक्षेत्र विकसित होत असून, मेक इन इंडिया आणि पीएलआय (प्रॉक्स लिंक्ड इन्सेंटिव्ह) योजनांमुळे इलेक्ट्रॉनिक्स औषधनिर्माण आणि वाहनक्षेत्रांत मोठीच वृद्धी झाली आहे. भारतीय उत्पादनक्षेत्राचा एकूण जीडीपीतील वाटा १७ टक्के आहे. तो वाटा २०२५ पर्यंत २५ टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट होते. आता २०३० पर्यंत तरी हे लक्ष्य गाठावे, असे केंद्र सरकारने ठरवले आहे. हवामान बदलाच्या संकटामुळे शेती दिवसेंदिवस अधिक गर्तेत जात असून, त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी कारखानदारीकडे वळणे, हे योग्य ठरणार आहे. याचा अर्थ, शेतीची उपेक्षा करायची, असे बिलकुल नाही. परंतु शेतीवर आवश्यकतेपेक्षा जास्त लोक अवलंबून असून, भारतात दरडोई शेतीचे सरासरी क्षेत्र अत्यल्प आहे. त्यामुळे त्यावर अख्ख्या कुटुंबाचा निर्वाह होऊ शकत नाही. म्हणूनच शेतीमध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या लोकांना उद्योगात सामावून घेण्याची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. उत्तर प्रदेशात बाराबंकी ते बाहराइच दरम्यान ६,९६९ कोटी रुपये खर्चाच्या राष्ट्रीय महामार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. १०१ किलोमीटर लांबीच्या या रस्त्यामुळे उत्तर प्रदेशातील आर्थिक, सामाजिक आणि लॉजिस्टिक्स केंद्रे जोडली जातील. जेवढ्या गतीने उत्तर प्रदेशचा विकास होईल, तेवढ्या प्रमाणात तेथून महाराष्ट्रात येणारे लोंढे कमी होऊ शकतील. २,५८५ कोटी रुपयांच्या लघु जलविद्युत विकास योजनेलाही केंद्राने मंजुरी दिली आहे. १५०० मेगावॅट नवीकरणीय ऊर्जाक्षमतेच्या विकासाला चालना देणे, हा त्यामागील हेतू आहे. देशात ७,१३३ ठिकाणी एकूण २१ हजार मेगावॅट क्षमतेच्या लघु जलविद्युत प्रकल्पांसाठी सिद्धता करण्यात आली आहे. याचा उद्योगधंद्यांनाच फायदा होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ३३,६६० कोटी रुपयांच्या भारत औद्योगिक विकास योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत देशभरात १०० प्लग अँड प्ले औद्योगिक पार्क विकसित केले जातील. हे पार्क म्हणजे, अशी विकसित औद्योगिक क्षेत्रे की जेथे कंपन्या कोणत्याही विशेष तयारीशिवाय त्वरित उत्पादन किंवा कामकाज सुरू करू शकतात. या योजनेद्वारे अंदाजे १५ लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, अशी सरकारला अपेक्षा आहे. देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे, हा या महत्त्वाकांक्षी योजनेचा उद्देश असून, तो स्वागतार्ह आहे. या योजनेंतर्गत १०० ते १००० एकर क्षेत्रांवर औद्योगिक पार्क विकसित केले जातील. त्यासाठी सरकारतर्फे प्रति एकर १ कोटी रुपयांचे आर्थिक साह्य दिले जाणार आहे. प्लग अँड प्लेची व्यवस्था असल्यामुळे कारखाना स्थापन करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा रेडीमेड स्वरूपात उपलब्ध असतात. परिणामी उत्पादन प्रक्रियेतून विलंब टळतो आणि गुंतवणूकदारांचा वेळ व खर्च वाचतो. ही क्षेत्रे इज ऑफ डुइंग बिझिनेस वाढवण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नाला साकार करण्यासाठी विकसित केली जात आहेत.

# डिजिटल शिक्षणाला चालना देण्यासाठी ८७ शाळांना संगणक वाटप : मंत्री रावल

प्रतिनिधी । दोंडाईचा



**शिंदखेडा मतदारसंघातील शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, राज्याचे मंत्री जयकुमार रावल यांच्या स्थानिक विकास निधीतून मतदारसंघातील एकूण ८७ माध्यमिक विद्यालयांना संगणक व प्रिंटरचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

दोंडाईचा येथील आमदार कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमास धुळे शहर भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, बाजार समिती सभापती नारायण पाटील, माजी नगराध्यक्ष डॉ. रवींद्र देशमुख, गटशिक्षण अधिकारी दीपक सोनवणे, दिनकर देवरे, एसव्हीएस संस्थेचे सामान्य प्रशासन सचिव ललितसिंह गिरासे, डी. एस. गिरासे आदी मान्यवर उपस्थित होते. मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, निवडणुकीदरम्यान मतदारसंघातील अनेक शाळांकडून संगणक उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने केली जात होती. त्या मागणीची दखल घेत मतदारसंघातील सर्व माध्यमिक शाळांना संगणक व प्रिंटर देण्याचा निर्णय घेण्यात आला. शिक्षण, सिंचन आणि उद्योग या त्रिसूत्रीवर आधारित विकासाला आम्ही प्राधान्य देत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. ना.रावल पुढे म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक झाले आहे. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही डिजिटल साक्षरता मिळवून विविध क्षेत्रात प्रगती करावी, यासाठी शासन आणि लोकप्रतिनिधींकडून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या संगणक व प्रिंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण, प्रोजेक्ट वर्क, ई-लर्निंग यांचा लाभ होणार असून त्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळेल. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, ग्रामीण भागातील शाळांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढेल तसेच त्यांना भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांसाठीही मदत होईल.

कार्यक्रमादरम्यान मंत्री रावल यांनी मतदारसंघात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला. रस्ते, पाणीपुरवठा, सिंचन प्रकल्प तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध योजना याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. आगामी काळातही मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

# जिल्ह्यातील ६७ ग्रा.पं.च्या रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर

● २८ एप्रिलला मतदान; २९ ला मतमोजणी : भामरे




प्रतिनिधी । नंदुरबार

**जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमधील सदस्य आणि थेट सरपंच पदाच्या रिक्त झालेल्या जागांसाठी निवडणूक आयोगाकडून पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये जिल्ह्यातील एकूण ६७ ग्रामपंचायतींचा समावेश असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (प्रशासन) प्रमोद भामरे यांनी दिली.**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर कारणांमुळे ग्रामपंचायतींमधील सदस्य आणि सरपंच यांची पदे रिक्त झालेली होती. या रिक्त जागा भरण्यासाठी आता प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया राबवली जात आहे. दि.३० मार्च २०२६ रोजी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करणे, निवडणूक कार्यक्रम असा तहसीलदारांकडून दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र (उमेदवारी अर्ज) सादर करणे, १५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजल्यापासून नामनिर्देशनपत्रांची छाननी, ७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस आहे. दुपारी ३ वाजेनंतर निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. दि. २८ एप्रिल रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत मतदान होईल. दि. २९ एप्रिल रोजी मतमोजणी आणि ६ मे रोजी निवडणूक निकालाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

# नंदनगरीच्या महाकाली माता मंदिरात चैत्रोत्सव जल्लोषात साजरा

प्रतिनिधी । नंदुरबार

**शहरातील देसाई पुरा भागातील क्षत्रिय कासार समाजातर्फे गेल्या बारा वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या श्री कालिका माता मंदिरात विविध धार्मिक उपक्रमांनी वर्धापन दिन जल्लोषात साजरा करण्यात आला.**

चैत्र नवरात्रोत्सवानिमित्त सकाळपासून महिला पुरुषांनी एकत्रित येऊन सप्तशती पाठ आणि विविध धार्मिक उपक्रम केले. याचबरोबर मंदिराच्या कळसावर बद्रीझिरा येथील संतश्री तारादास बापू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मंदिराच्या प्रवेशद्वारापासून आतील गाभाऱ्यात केळींचे खांब विविध आकर्षक फुलमाळांनी सजावट करण्यात आली होती. याप्रसंगी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना तारादास बापू म्हणाले की, महाकालिका माता सर्वांची कुलदेवी असून भाविक भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारी आहे. महालक्ष्मी व महाकाली यांचा कृपाप्रसाद सर्वांवर आहे. सर्व धन, संपत्ती, वैभव आहे. मात्र, मनशांती नाही. जीवनात देवी कालिकाची आराधना केल्यास शाश्वत यश मिळते, असे प्रतिपादन तारादास बापू यांनी केले.

वार्षिक उत्सवानिमित्त महिला आणि पुरुष भाविकांनी परंपरेनुसार रक्तदान शिबिरात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. शहरातील जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले. आरतीनंतर असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी परिसरातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. कालिका माता मंदिरात दरवर्षी चैत्र नवरात्र आणि अश्विन नवरात्र उत्सवात विविध धार्मिक उपक्रम होत असल्याची माहिती महिला मंडळाचे अध्यक्षा शारदा अंधारे यांनी दिली.

# भारतीय जनगणना २०२७ चे कामकाज अचूक करावे

## जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या सूचना

प्रतिनिधी । नंदुरबार

**भारतीय जनगणना २०२७ साठी सर्व चार्ज अधिकारी, जनगणना अधिकारी प्रगणक, पर्यवेक्षक तसेच इतर सर्व जनगणना कर्मचारी यांनी जिल्ह्यातील जनगणनेचे काम अत्यंत चांगले व अचूक करावे अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिल्या.**



भारतीय जनगणना २०२७ च्या पहिला टप्प्याच्या कामकाजासाठी जिल्ह्यातील अधिकारी, जनगणना अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी जिल्हा नियोजन भवन येथे २३ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत सहाय्यक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी बोलत होत्या.

जिल्हाधिकारी शहादा परिविक्षाधिन सनदी जनगणना उपसंचालक जीआरचे श्रीकांत बनकर, तळोदा उपजिल्हाधिकारी समन्वयक प्रदीप सिंग आदी मान्यवर उपस्थित होते. कृष्णकांत कनवारीया, शिवांश सिंह, सागर बागुल, एसआय सरदार सरोवर प्रकल्प श्याम वाडकर, आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी पुढे म्हणाल्या की, भारतामध्ये जनगणना १८७२ पासून केली जात असून ही देशातील १६ वी जनगणना आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना आहे. ही जनगणना पुर्ण डिजीटल आहे. ही जनगणना दोन टप्पात होणार आहे. जनजगणेची माहिती संकलीत कशी करावी, यासाठी हे तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणार्थींनी हे प्रशिक्षण चांगल्या प्रकारे समजून घ्यावे, असे त्यांनी यावेळी सांगितले. जनगणना उपसंचालक सागर बागुल व एसआय जीआरचे श्रीकांत बनकर हे या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींना पी.पी.टी. द्वारे मार्गदर्शन करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### शेळगाव बॅरेज सिंचन....

या प्रकल्पामुळे ११ गावांतील एकूण १२२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध होऊन शेती उत्पादनात वाढ होण्यास मोठी मदत होणार आहे. प्रकल्पाच्या खर्चामध्ये कालानुरूप वाढ झाली असून १९९७-९८ मध्ये रु. १९८ कोटी रुपयांची मूळ मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर २०११-१२ मध्ये रु. ६९९.४८ कोटी रुपयांची प्रथम सुधारणा, २०१७-१८ मध्ये रु. ९६८.९७ कोटी रुपयांची द्वितीय सुधारणा करण्यात आली. आता २०२३-२४ मध्ये तृतीय सुधारणा करत प्रकल्पाची किंमत रु. १४०७.२० कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

### माता, बाल आरोग्य......

या शिबिरांद्वारे विविध जिल्हा रुग्णालयांमध्ये हृदयरोग तज्ज्ञांकडून एकूण २,५०७ टू-डी-इको तपासण्या करण्यात आल्या. तसेच जन्मजात हृदयरोग (सीएचडी) उपचारासाठी राज्यभरातील आरबीएसके पथकांमार्फत ३२२६ बालकांवर श्री सत्य साई संजीवनी केंद्र येथे उपचार करण्यात आले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार श्री सत्य साई संजीवनी केंद्राने पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि सातारा जिल्ह्यातील जावळी या आदिवासी बहुल तालुक्यांना दत्तक घेऊन तेथे विशेष आरोग्य उपक्रम राबविले. तसेच पुण्यातील शहरी झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यात आल्या. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आरोग्य सेवा पोहचविण्यात येत आहेत.याशिवाय, आजपर्यंत आशा, अंगणवाडी सेविका, सहाय्यक परिचारिका आणि वैद्यकीय अधिकारी अशा ३५०० हून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांना क्षमता विकास प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे सर्व उपक्रम राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

### भेसळखोरांवर 'मकोका'.....

वर्सोवा पोलिस ठाण्याच्या पथकासह नवजित नगर, अंधेरी (प.) येथे एकूण सात ठिकाणी छापा टाकला असता तेथे अमूल आणि गोकुळ या नामांकित ब्रँडचे लेबल असलेल्या दुधामध्ये भेसळ करण्याचा प्रकार उघडकीस आल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. या प्रकरणात आत्तापर्यंत १४ जणांवर अटक करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. त्यावर आमदार भाई जगताप यांनी, या आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करणार का, असा प्रश्न विचारला. परंतु, मकोकाच्या धर्तीवर एक नवा कायदा येत असल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. मात्र, त्यावर आमदार जगताप आणि अनिल परब यांनी जोरदार आक्षेप घेतला. जीवनावश्यक वस्तूत भेसळ झाल्यावर जिवावर बेतू शकते हे माहिती असून संघटित गुन्हेगारीवर मकोका का लावता येत नाही, असा प्रश्न विचारला.

### कापूस खरेदीला मुदतवाढ.....

लाँग स्टेपल कापसाला प्रति क्विंटल ८,१७० रुपये, तर मिडीयम स्टेपल कापसाला ७,१०० रुपये दर देण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना मागील हंगामाच्या तुलनेत अधिक लाभ मिळाला. पीक कापणीच्या जिल्हानिहाय सरासरीऐवजी राज्यातील सर्वाधिक २३.६८ क्विंटल ही सरासरी संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला २३.६८ क्विंटलपर्यंत कापूस विक्रीची संधी उपलब्ध झाली आणि अधिकाधिक शेतकऱ्यांचा कापूस खरेदी प्रक्रियेत समाविष्ट होऊ शकला, असे मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

### राजमाता जिजाऊ बस......

आणि प्रवासी-केंद्रित होण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बसचे पूजन करून आणि फीत कापून या सेवेचा शुभारंभ केला. या बस सेवेचे लोकार्पण झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बसमधून प्रवास केला. यावेळी बसच्या समोर प्रतिकात्मक स्वरूपात घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या देखाव्यामुळे हा लोकार्पण सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरला.

### राजस्थान रॉयल्स संघ......

अमेरिकन उद्योगपती रॉब वॉल्टन आणि हॅम्प कुटुंबाचा पाठिंबा आहे. आयपीएल २०२६ हंगामानंतर ही विक्री अधिकृतपणे लागू होणार आहे.आयपीएलच्या इतिहासातील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा व्यवहार ठरणार आहे. गेल्या वर्षी टॉरेंट ग्रुपने सीव्हीसी कॅपिटल पार्टनर्सकडून गुजरात टायटन्समधील ६७% हिस्सा सुमारे ५,०२५ कोटी रुपयांना विकत घेतला होता, ज्यामुळे त्या फ्रँचायझीची एकूण किंमत सुमारे ७५०० कोटी रुपये ठरली होती. सीव्हीसी कॅपिटलने २०२१ मध्ये ५६२६ कोटी रुपयांना संघ खरेदी केल्यानंतरही ३३% हिस्सा स्वतःकडे ठेवला होता.

# कृष्णजन्म सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । शहादा

**मोहिदे ता. शहादा येथील जयप्रकाश आर.पाटील यांच्या आई सीताबाई आर.पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ सुरू असलेले भागवत कथेत दि. २२ मार्च रोजी कृष्णजन्म सोहळा साजरा झाला.**

कृष्ण जन्म झाल्यावर ज्या पाळण्यात ठेवून पाळणा हलविला. तो फुलांनी व रंगीबेरंगी फुग्यांनी सजवला होता. परिसर सुद्धा रांगोळ्या काढून सुशोभित केला होता. त्या सोहळ्यासाठी नंदुरबार, शिरपूर, शहादा, तळोदा आदी तालुक्यातील बहुसंख्य महिला-पुरुष उपस्थित होते. श्रीराम मंदिरासमोरील भाग, स्तंभ चौक आधी सर्व भागात मंडप उभारण्यात आले होते. कृष्ण जन्मानंतर त्याच मंडपात महाप्रसादाचे वाटप झाले. कृष्ण जन्म सोहळ्याच्या प्रारंभी कथाकार भागवताचार्य जतीनदादा जानी (धरमपूर) यांनी राधा-कृष्ण यांच्या प्रेमाची माहिती विषद केली. ओम नमो भगवते वासुदेवाय या मंत्राचा सतत जप केला तर परमेश्वर प्रसन्न होतो. पाच वर्षाच्या ध्रुव या बालकाने वनात जाऊन या मंत्राचा सतत जप केला. त्या ध्रुव बाळाला देव प्रसन्न झाले.परमेश्वराने त्याची मागणी मान्य केली.

# वावडदा येथे सुमित पाटील यांचा सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

**गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघटनेच्या जळगाव तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच कुणबी मराठा समाजातील हजारो विवाह संबंध जोडल्याच्या सामाजिक कार्यासाठी पत्रकार सुमित जानकीराम पाटील यांचा गौरी उद्योग समूह,वावडदा येथे राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना.गुलाबराव पाटील यांचे स्वीय सहाय्यक नवलसिंग राजे पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**



या कार्यक्रमात सुमित पाटील यांची पत्रकारिता क्षेत्रातील ही यथार्थ निवड असून त्यांनी आजवर केलेल्या कार्याचा हा गौरव असल्याचे मत सर्वांनी यावेळी व्यक्त केले.सुमित पाटील यांचा परिसरातील सामाजिक कार्यात देखील सक्रिय सहभाग असतो. याचे देखील सर्वांनी भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमास माजी प्राचार्य मंगल बी.पाटील, वावडदा गावातील ज्येष्ठ नागरिक लहू पाटील, हिंमत पाटील, ईश्वर येवले, संतोष कापडणे, अक्षय लाडवंजारी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पर्यावरण संतुलन राखण्यासाठी चिमण्यांचे संवर्धन करणे गरजेचे: अभिजीत पाटील

प्रतिनिधी । शहादा

**शहरीकरण प्रदूषण आणि झपाट्याने कमी होत चाललेली झाडांची संख्या यामुळे चिमण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटत आहे. पर्यावरण संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या चिमण्यांचे सर्व स्तरातून संवर्धन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शहाद्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी केले.**



शहादा येथील सामाजिक वनीकरण विभागातर्फे जागतिक चिमणी दिवसानिमित्त कृत्रिम घरटी व खाद्य पात्रे वाटप करण्यात आले. त्यावेळी नगराध्यक्ष श्री. पाटील बोलत होते. यावेळी विकास प्रतिष्ठानचा अध्यक्षा प्रीती पाटील, वनक्षेत्रपाल रामकृष्ण लामगे, वनपाल विजय फणसे, ईश्वर चव्हाण, साधना वाडीले, अश्विनी चव्हाण, वनरक्षक सिद्धार्थ बैसाणे, भूपेश तांबोळी, गंगोत्री गवळे, दिपाली पाटील यांसह कर्मचारी उपस्थित होते. अभिजीत पाटील म्हणाले की, चिमणीचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असून घराच्या परिसरात चिमण्यांसाठी पाणी व धान्य ठेवावे तसेच सुरक्षित घरटे तयार करण्यास मदत करावी. लहानशा प्रयत्नांमुळे या लहान पक्षांचे अस्तित्व टिकून ठेवता येऊ शकते. चिमणी हा केवळ पक्षी नसून पर्यावरणाच्या आरोग्याच्या निर्देशक देखील असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी वनविभागाचे विभागीय वनाधिकारी डॉ. गुजर, सहाय्यक वनसंरक्षक अर्पणा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा वनपरिक्षेत्रातील विविध ठिकाणी जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले होते. त्यात म्हसावद (ता. शहादा) येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानात उपजिल्हाधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, तहसीलदार संभाजी पाटील, सरपंच युवराज ठाकरे, उपसरपंच सचिन बेदमुथा, भगवान पाटील, संजय पाटील आदींसह ३ ग्रामपंचायत सदस्य व मान्यवरांना पक्ष्यांच्या संवर्धनासाठी कृत्रिम घरटी व खाद्यपात्रे भेट देण्यात आली.

यासोबतच शहादा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात पोलीस उपाधीक्षक दत्ता पवार व कर्मचाऱ्यांनाही कृत्रिम घरटी व खाद्य पात्रे भेट देण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# गॅस टंचाईमुळे केटरिंग व्यवसाय संकटात

## २५ हजार कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर ; आज बैठक

प्रतिनिधी । जळगाव

**गॅस टंचाईमुळे केटरिंग व्यवसाय संकटात सापडला आहे. त्यामुळे सुमारे २५ हजार कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न अतिशय गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर, खान्देश केटरिंग असोसिएशनने जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची भेट घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, केटरिंग व्यावसायिकांच्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी जिल्हा प्रशासनानेही बुधवारी एका बैठकीचे आयोजन केले आहे.**

गेल्या काही आठवड्यांपासून व्यावसायिकांना एलपीजी गॅसचा पुरेसा आणि नियमित पुरवठा झालेला नसल्याने मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम अडचणीत आले आहेत. लग्नसराईचा हंगाम सुरू असतानाच ही समस्या उद्भवल्याने केटरिंग व्यावसायिकांची कोंडी झाली आहे. अनेकांनी सहा ते आठ महिन्यांपूर्वीच लग्नसमारंभ, वाढदिवस, धार्मिक कार्यक्रम यांसाठी बुकिंग घेतलेली आहेत. मात्र, गॅसअभावी या कार्यक्रमांचे नियोजन करणे आणि दर्जेदार सेवा देणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे, केटरिंग व्यवसायासाठी लग्नसराईचे दोन महिने अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. त्यानंतर चार महिने लग्नाचे मुहूर्त नसल्याने व्यवसायात मोठी मंदी येते. त्यामुळे सध्या मिळणारे काम हेच वर्षभराच्या उत्पन्नाचा मोठा आधार असतो. अशा निर्णायक काळात गॅस टंचाई निर्माण झाल्याने आर्थिक फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

**गॅस टंचाईमुळे काळाबाजार**

खान्देश केटरिंग असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केटरिंग व्यवसायावर थेट आणि अप्रत्यक्षपणे सुमारे २५ हजार कामगार अवलंबून आहेत. यात स्वयंपाकी, वेटर, भांडी धुणारे, डेकोरेशन कामगार, वाहतूक करणारे कर्मचारी, अशा विविध घटकांचा समावेश आहे. गॅस पुरवठा सुरळीत न झाल्यास या सर्वांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार असून अनेकांना



पर्यायी रोजगारासाठी स्थलांतर करण्याची वेळ येऊ शकते. याशिवाय, गॅस टंचाईमुळे काळाबाजारही फोफावल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही ठिकाणी जादा दराने सिलिंडर मिळत असल्याने व्यावसायिकांचा खर्च वाढला असून, त्याचा परिणाम थेट ग्राहकांवर होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नियमित आणि पारदर्शक गॅस वितरण व्यवस्था उभी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत तातडीने संबंधित विभागांना सूचना दिल्या आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी दि.२५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता केटरिंग असोसिएशनच्या प्रतिनिधींसोबत विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत गॅस वितरण कंपन्यांचे प्रतिनिधी, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित राहणार आहे. असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष रतन सारस्वत, जिल्हा उपाध्यक्ष दिनेश टाटिया, शहर उपाध्यक्ष गोपाल अग्रवाल, सचिव महेंद्र टाडा, सदस्य रामचंद्र टाडा, मेघराज महाराज तसेच सल्लागार राजेंद्र वैष्णव यांच्यासह अनेक पदाधिकारी निवेदन सादर करताना उपस्थित होते. यावेळी जळगाव जिल्ह्यातील सुमारे ११० केटरिंग व्यावसायिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात हजेरी लावून आपली व्यथा मांडली. बुधवारी होणाऱ्या बैठकीत व्यावसायिकांना तातडीने दिलासा मिळेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उष्णतेच्या लाटेचा वाढता प्रभाव; खबरदारी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी । जळगाव

**मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात उन्हाळ्याची तीव्रता मोठ्या प्रमाणात जाणवत असून, पुढील काही दिवसांमध्ये तापमानवाढ कायम राहण्याचे संकेत मिळत आहेत. उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.**

उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर उष्णताजन्य आजार टाळण्यासाठी नागरिकांनी दिवसभरात पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. तहान लागली नसली तरी नियमित पाणी प्यावे, तसेच प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. लिंबूपाणी, ताक, लस्सी व फळांचे रस यांसारख्या पेयांचा वापर करावा. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे व भाज्या आहारात समाविष्ट करावीत. तसेच, पातळ, सैल व हलक्या रंगाचे सुती कपडे परिधान करावेत. बाहेर जाताना डोके झाकण्यासाठी टोपी, छत्री किंवा रुमालाचा वापर करावा. शक्यतो सकाळी व संध्याकाळीच बाहेरील कामांचे नियोजन करावे. दुपारी १२ ते ३ या वेळेत बाहेर पडणे टाळावे. हवामानविषयक अद्ययावत माहिती जाणून घेण्यासाठी भारतीय हवामान विभागाच्या संकेतस्थळावर माहिती घ्यावी, टीव्ही व वर्तमानपत्रांमधील सूचना लक्षात घ्याव्यात. लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध नागरिक, घराबाहेर काम करणारे कामगारांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

## थोडक्यात

### कंजरभाट फाउंडेशनच्या अध्यक्षपदी योगेश बागडे

**जळगाव ।** कंजरभाट समाज युवा फाउंडेशनची वार्षिक सर्वसाधारण सभा के.बी.एस.समाजमंदिर येथे उत्साहात पार पडली. या सभेत सर्वानुमते योगेश अनिल बागडे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सभेची सुरुवात सचिव राहुल नेतलेकर यांनी प्रास्ताविक करून केली. मुख्य सल्लागार मोहन गारुंगे, उपाध्यक्ष प्रदीप नेतलेकर, शशिकांत बागडे, विजय अभंगे, नरेश बागडे, उमेश माछरेकर, संदीप गारुंगे, गणेश बागडे, वीर दहियेकर, गौतम बागडे, क्रांती बाटूंगे, संदीप बागडे, पंकज गागडे, राहुल दहियेकर, सुमित माछरे उपस्थित होते.

### अवैध वाळूच्या एका डंपरवर कारवाई

**जळगाव ।** तालुक्यातील शिरसोली ते कुऱ्हाडदा रस्त्याच्या दरम्यान रात्री बेफाम वाळू वाहतूक चालते. या वाहतुकीविरोधात नागरिकांनी नाराजी व्यक्त केली होती. जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत माहिती देताच त्यांनी तहसीलदारांना कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार दि. २३ मार्च रोजी रात्री १० वाजता १ डंपरवर कारवाई करण्यात आली आहे. शिरसोली ते कुऱ्हाडदा रस्त्यावर रात्री बेरात्री वाळू माफियांचे डंपर बेफामपणे धावत असतात. सोमवारी रात्री १० वाजता झुलेलाल वॉटर पार्कजवळ एका अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरला तहसीलदारांच्या पथकाने शिरसोली व वावडदा दरम्यान अडवले. त्याच्याकडे कुठल्याही प्रकारचे वाळू परवाना नसल्याने त्या डंपरवर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती शासकीय अधिकाऱ्यांकडून मिळाली.

### नशिराबादमध्ये विशेष कोंबिंग ऑपरेशन

**नशिराबाद ।** जळगाव जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या विशेष मोहिमेत नशिराबाद परिसरात महत्त्वाची कारवाई करत दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला अटक करण्यात यश आले आहे. चेतन सूर्यभान पाटील (वय १८) याला दोन गावठी कट्ट्यांसह पोलिसांनी पाठलाग करून ताब्यात घेतले. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार २३ मार्च रोजी सायंकाळी ४ ते रात्री ११ या कालावधीत नशिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या मोहिमेदरम्यान अवैध दारू विक्री आणि जुगार अड्ड्यांवरही धडक कारवाई करण्यात आली. तसेच अवैध रेती वाहतूक करणारा एक डंपर जप्त करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.दरम्यान, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांना गुप्त माहिती मिळाली होती.

## पेट्रोल संपल्याच्या अफवांना बळी पडू नका

### जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचे नागरिकांना आवाहन

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील काही पेट्रोल पंपांवर पेट्रोल संपल्याच्या अफवा सध्या मोठ्या प्रमाणावर पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे. या अफवांमुळे नागरिकांमध्ये अनावश्यक भीती आणि गोंधळ निर्माण होऊन पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे.**



या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जळगाव शहर तसेच संपूर्ण जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची इंधन टंचाई निर्माण झालेली नाही. इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीतपणे कार्यरत असून संबंधित यंत्रणेकडून सातत्याने देखरेख ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्यावतीने करण्यात आले आहे. सोशल मीडियावर फिरणाऱ्या अप्रमाणित संदेशांमुळे भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याने नागरिकांनी केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा. तसेच, भीतीपोटी इंधनाचा साठा करण्याचा किंवा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पेट्रोल-डिझेल खरेदी करण्याचा प्रयत्न करू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळून वाहतूक कोंडी व कायदा-सुव्यवस्थेची समस्या निर्माण होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन आणि संबंधित कंपन्यांकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून नागरिकांनी प्रशासनावर विश्वास ठेवावा, असेही सांगण्यात आले आहे. दरम्यान, अफवा पसरविणे किंवा चुकीची माहिती प्रसारित करणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा असून अशा प्रकारच्या कृत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. कोणतीही शंका असल्यास नागरिकांनी अधिकृत शासकीय माध्यमांद्वारेच माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासन नागरिकांना शांतता, संयम व सहकार्य राखण्याचे आवाहन करीत आहे. सर्वांच्या सहकार्याने कोणतीही अनुचित परिस्थिती निर्माण होणार नाही, याची खात्री बाळगावी, असेही जिल्हाधिकारी घुगे यांनी स्पष्ट केलं आहे.

## सेवानिवृत्त फौजदाराच्या घरात तिसऱ्यांदा घरफोडी

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील निमखेडी रोडवरील स्वामी पार्क परिसरात एका सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षकाचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी २ लाख ४० हजार ५०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी जळगाव तालुका पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मगन वनाजी मोहिते (वय ६२, रा.स्वामी पार्क, विठ्ठल मंदिराजवळ, निमखेडीरोड) हे सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक आहेत. दि. २२ मार्च रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते पत्नीसह मूळ गावी (होळनांथे, ता.शिरपूर) शेतीच्या कामासाठी गेले होते. दरम्यान, त्यांचे घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कपाटातील एकूण २,४०,५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

## तंत्रज्ञान, अभ्यासाच्या जोरावर आदर्श लोकप्रतिनिधी घडवा : दीपक करंजीकर

प्रतिनिधी । जळगाव

**नगरसेवक म्हणून कामकाजाची माहिती मिळवण्यासाठी दररोज अपडेट राहा. तंत्रज्ञानाशिवाय आता पर्याय नाही, त्यामुळे डिजिटल युगाशी जुळवून घ्या, असे करंजीकर यांनी सांगितले. पुढील १०० दिवसांत कोणत्याही पाच महत्त्वाच्या कामांची निवड करून ती पूर्णत्वास नेण्याचा निर्धार करा, असे प्रतिपादन महाराष्ट्र नीती आयोगाचे सदस्य दीपक करंजीकर यांनी केले.**



जळगाव महानगरपालिकेतर्फे महापौर दीपमाला काळे यांच्या संकल्पनेतून नवनिर्वाचित नगरसेवकांसाठी विशेष कार्यक्षमता वृद्धी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नगरसेवक व सभागृह नेते नितीन लड्ढा होते. मंचावर महापौर दीपमाला काळे, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती सिंधुताई कोल्हे, अतिरिक्त आयुक्त शोभाताई बाविस्कर, उपायुक्त निर्मला गायकवाड, धनश्री शिंदे, तसेच वित्त व लेखा अधिकारी विजयकुमार सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. महापौर दीपमाला काळे यांनी प्रास्ताविकातून या कार्यशाळेमागचा उद्देश स्पष्ट केला. एक सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून घडण्यासाठी सातत्याने प्रशिक्षण घेण्याची गरज आहे,असे त्यांनी नमूद केले. जळगावची लोकसंख्या सहा लाखांवर आहे. शहरातील डॉक्टर, वकील, कलाकार अशा विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची डेटा बँक तयार करा, जेणेकरून शहराच्या विकासात त्यांची मदत घेता येईल. महापालिकेच्या ग्रंथालयातील ५८ हजार पुस्तके जनतेसाठी कशी उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. शहर शिस्तबद्ध करायचे असेल, तर आधी स्वतःला शिस्त लावा आणि स्वतःचे डॉक्युमेंटेशन पक्के ठेवा, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. अध्यक्षीय भाषणात नितीन लड्ढा यांनी सांगितले की, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी नगरसेवकांचा स्वतःचा अभ्यास असणे आवश्यक आहे. अभ्यासू व्यक्तिमत्वच सभागृहात आणि प्रशासनात आपली छाप पाडू शकते. सूत्रसंचालन नगरसेविका ॲड. सुचिता हाडा यांनी केले, तर परिचय नगरसेविका सुरेखा तायडे यांनी करून दिला. आभार नगरसेविका गायत्री राणे यांनी मानले.

## ऑलिंपियाड परिक्षेत गुरुकुलचा नक्षत्र येवले झळकला

प्रतिनिधी । पाचोरा

**आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड स्पर्धेत गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलचा इयत्ता चौथीचा (इंग्रजी माध्यम) विद्यार्थी नक्षत्र प्रशांत येवले याने उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचे नावलौकिक उंचावले आहे. नक्षत्रने आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखवत तब्बल तीन सुवर्णपदके पटकावली असून त्याने सर्व विषयांत अव्वल कामगिरी केली आहे.**



इंग्रजीमध्ये ८३.८८% शाळेत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. तर विज्ञान ७६.४१% शाळेत प्रथम क्रमांक सुवर्णपदक, गणितमध्ये ८७.७६% गुण मिळवून शाळेत व्दितीय क्रमांक आणि सुवर्णपदक अशा तीन दैदिप्यमान यशाबद्दल शाळेचे प्रा. प्रेमकुमार शामनाणी यांनी नक्षत्रचे कौतुक करत, त्याचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून त्याने शाळेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे, असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, नक्षत्र हा पाचोरा येथील पत्रकार प्रशांत येवले यांचा मुलगा आहे. त्याच्या या यशामुळे परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## निर्मल इंटरनॅशनल स्कूलमध्ये चिमुकल्यांचा पदवी सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । पाचोरा

**तात्यासाहेब आर. ओ. पाटील नगर येथील निर्मल इंटरनॅशनल स्कूलच्या पूर्व प्राथमिक विभागात सिनियर केजीतील चिमुकल्यांचा पदवी प्रदान समारंभ उत्साहपूर्ण व आनंदमय वातावरणात मोठ्या जल्लोषात पार पडला. लहानग्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, उत्सुकता आणि यशाचा अभिमान यामुळे संपूर्ण परिसर खऱ्या अर्थाने आनंदोत्सवाने उजळून निघाला.**



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभ हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. समारंभाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आकर्षक पदवीदान पोशाख व ग्रॅज्युएशन कॅप परिधान करून आपल्या शैक्षणिक प्रवासातील पहिला महत्त्वाचा टप्पा मोठ्या अभिमानाने साजरा केला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा वैशालीताई सुर्यवंशी, शाळेचे प्राचार्य गणेश राजपूत, समन्वयक स्नेहल पाटील, पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख फरीदा भारमल तसेच वर्षा पाटील यांच्या हस्ते सिनियर केजीमधील सुमारे ८३ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी अध्यक्षा वैशालीताई सुर्यवंशी यांनी आपल्या मनोगतात अत्यंत प्रभावी शब्दांत शाळेच्या कार्यपद्धतीचा उहापोह केला. सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका भूमिका चौबे यांनी तर आभार फरीदा भारमल यांनी मानले.

# आधुनिक डिजिटल युगातही पुस्तक वाचनाची गोडी हवी !

## जळगाव ग्रंथोत्सवाला उत्साहात सुरुवात; वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्याचा मान्यवरांनी दिला संदेश

प्रतिनिधी । जळगाव

**शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, जळगाव व व. वा. वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा ग्रंथोत्सव-२०२६ ला आज उत्साहात सुरुवात झाली.ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवशी सकाळी महापौर दीपमाला काळे यांच्या उपस्थित पारंपरिक ग्रंथदिंडी काढून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.**

याप्रसंगी माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, मनपा स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, वा. वाचनालयाचे ग्रंथपाल अनिल अत्रे उपस्थित होते. यानंतर मान्यवरांच्या हस्ते सकाळी ११ वाजता ग्रंथोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी माजी महापौर सीमा भोळे, सहाय्यक ग्रंथालय संचालक सचिन जोपुळे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रविंद्र ठाकूर, जळगाव जिल्हा ग्रंथालय संघ अध्यक्ष सतीश पाटील, प्रा.डॉ. शुभदा कुलकर्णी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी



मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून वाचनसंस्कृतीचा प्रसार करण्याचे आवाहन करताना, आधुनिक डिजिटल युगातही पुस्तक वाचनाची गरज कायम असल्याचे अधोरेखित केले. ग्रंथालय चळवळ अधिक बळकट करण्यासाठी अशा ग्रंथोत्सवांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे त्यांनी नमूद केले. कालानुरूप बदलती वाचनसंस्कृती या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादात डिजिटल युगातील वाचनाच्या बदलत्या प्रवृत्ती आणि पुस्तक वाचनाचे महत्त्व यावर वक्त्यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथोत्सवात पुस्तक प्रदर्शन व विक्रीसह विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येत आहे. विविध प्रकाशनांचे स्टॉलही या ठिकाणी लावण्यात आले आहे. विद्यार्थी, वाचक आणि साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद या उपक्रमाला लाभत आहे. ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, दि. २५ मार्च रोजी मराठी भाषा या विषयावर परिसंवाद आयोजित केला असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषेतील संधी व आव्हाने यावर चर्चा होणार आहे. याशिवाय कवीसंमेलन व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. नागरिकांनी ग्रंथोत्सवास भेट देऊन उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पानशेवडी, खंडणे, चांदणे तलाव पेसा गावांतील समस्यांसाठी गावकऱ्यांचे आंदोलन

## बिडीओंनी केली चौकशी समिती गठित

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील मोहरद ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या खंडणे, चांदणे तलाव व पानशेवडी या पेसा गावातील विविध मागण्यांसाठी आज पंचायत समिती कार्यालयावर गावकऱ्यांनी मोर्चा काढला. या मोर्चाच्या समाधानाकरिता गटविकास अधिकारी अंजली बर्गे यांनी तातडीने चौकशी समिती नेमून दि.१ एप्रिल रोजी गावात जाऊन चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले असून तुर्त न्यायाची वाट पाहावी लागणार आहे.**



चांदण्या तलाव, पानशेवडी खंडणे ही गावे पेसा अंतर्गत असल्यावर सुद्धा अनेक पायाभूत सुविधा मिळत नसल्याने गावाकऱ्यांत संताप निर्माण झाला होता. त्यामुळे त्यांनी विविध मागण्यांसाठी पंचायत समिती कार्यालयावर मोर्चा काढला होता. यावर तोडगा म्हणून गटविकास अधिकारी अंजली वर्ग यांनी चौकशी समिती गठित केली आहे. त्यात विस्तार अधिकारी के. यु. कुमावत, (ग्रा.पं.), पी.जे.अहिरे विस्तार अधिकारी (कृषी),डी. आर. डोखे शाखा अभियंता (बांधकाम), बी. व्ही. सूर्यवंशी कनिष्ठ लेखाधिकारी यांचा समावेश आहे. तक्रारदार संजय गगनदास बारेला व गावकऱ्यांनी केलेल्या तक्रारीची

वस्तुनिष्ठ चौकशी करून चौकशी अहवाल सादर करण्याचा आदेश समितीला गटविकास अधिकारी बर्ग यांनी दिला आहे.

यावेळी संजय गणदास बारेला, मगन भाया बारेला, भारत पामसिंग बारेला ,अनिल श्रीराम बारेला, वेहल्या वेरसिंग बारेला, महारू कलजी बारेला ,ईश्वर वेरसिंग बारेला, नानसिंग मदा बारेला, राजू भाया बारेला, वाहऱ्या पुसल्या बारेला, अशोक गुला बारेला यांच्यासह २५ /३० आदिवासी महिला-पुरुष आंदोलनावेळी उपस्थित होते.

## पिंपळगाव हरेश्वर येथे शेतकऱ्यांचे आंदोलन

प्रतिनिधी । पिंपळगाव हरेश्वर

येथील गोविंद महाराज मंदिर समोर शेतकऱ्यांनी अत्यावश्यक रस्त्याच्या मागणीसाठी दि.२१ मार्चपासून आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा चौथा दिवस असतानाही शासनाकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नाही. पिंपळगाव हरेश्वर ते जरंडी दरम्यानचा सुमारे ५ किलोमीटरचा जुना जरंडी रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत असून प्रत्यक्षात रस्ता अस्तित्वात नसल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. या मार्गावरून पायी चालणेही कठीण झाले आहे. शेतीपर्यंत पोहोचणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. या आंदोलनाचे नेतृत्व श्वेता पाटील करत असून, लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. आमरण उपोषण करताना येथील शेतकऱ्यांची कोणाकडूनच दखल घेतली गेली नाही.गेल्या १२ वर्षांपासून ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, आमदार व प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे.

## चुनारअळी युवा मंचतर्फे ईद मिलन उत्साहात



प्रतिनिधी । चोपडा

**येथील चुनारअळी तथा भोकरवाडा युवा मंचतर्फे आयोजित ईद मिलन सोहळा व सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार कार्यक्रम दि. २३ मार्च रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. बंधुभाव, एकता आणि सामाजिक सलोखा जपणारा हा कार्यक्रम नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत रंगला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी विधानसभा सभापती अरुणभाई गुजराथी होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. संदीप पाटील, शहर पोलिस निरीक्षक मधुकर साळवे व आरिफ शेख सिद्दकी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणारे दीपक जैन, राज मोहम्मद शिकलकर आणि दिलीप नेवे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी ईद सणाच्या शुभेच्छा देत समाजात सौहार्द आणि एकोपा टिकवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विविध धर्म आणि समाजघटकांनी एकत्र येऊन सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमास आरिफ मेंबर, मुक्तार सरदार, रॉयल मिस्तरी, मजहर सय्यद, भुऱ्या पेंटर, अब्दुल तेली, ॲड. हुसेन सय्यद, गफ्फार अली, शोएब शेख, इस्माईल तेली, इम्तियाक जहांगीर, तय्यब बागवान, लक्ष्मण काविरे, सुनील सोनगिरे, असदर सय्यद (मुख्याध्यापक), ॲड. संदेश नेवे, हारुण कच्छी, युसुफभाई, नोमान काजी आदींसह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### नांदवेल येथे जलअर्पण दिवस उत्साहात

**मुक्ताईनगर ।** ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मुक्ताईनगर यांच्या वतीने ग्रामपंचायत नांदवेल येथे जलजीवन मिशन अंतर्गत आज दि.२३ मार्च रोजी जल अर्पण दिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात कलश पूजन करून करण्यात आली. यावेळी महिला मंडळ, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते. पाणी आडवा, पाणी जिरवा, जल है, तो कल है!, पाणी हेच जीवन... अशा घोषणांनी परिसरात जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी शपथ घेऊन पाण्याची बचत करण्याचा निर्धार केला.

## पंकज विद्यालयात शहीद दिन साजरा



प्रतिनिधी । चोपडा

**येथील पंकज विद्यालय (प्राथमिक) येथे दि.२३ मार्च रोजी शहीद दिवस अत्यंत उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात शहिदांच्या प्रतिमेस चंद्रकात जाधव, अनिल पाटील व गायत्री शिंदे यांच्या हस्ते माल्यार्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून शहिदांना आदरांजली अर्पण केली.

कु. लावण्या पाटील हिने सादर केलेल्या सुमधुर देशभक्तीपर गीताने कार्यक्रमात विशेष रंग भरला. तिच्या गायनामुळे उपस्थितांमध्ये उत्साह व अभिमानाची भावना निर्माण झाली होती.

## मलकापुरात एटीएम फोडण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी । मलकापूर

येथील हनुमान चौक परिसरात मध्यरात्री थरारक प्रकार घडला असून भारत कला रोड येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएम फोडण्याचा अयशस्वी प्रयत्न झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. रात्री साधारणपणे १ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने एटीएम बूथमध्ये प्रवेश करून प्रथम सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न सुरू असतानाच मोठा आवाज झाल्याने परिसरातील काही नागरिक जागे झाले. आवाजाची चाहूल लागताच चोरटा घाबरून घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली आहे.

## १४ वर्षीय उमेश पाटीलच्या धाडसाला सलाम

### अनेर नदीत बुडणाऱ्या चौघांचे वाचवले प्राण

प्रतिनिधी । चोपडा



**अनेर नदी पात्रात बुडणाऱ्या चार मुलांचे प्राण वाचवून १४ वर्षीय उमेश उर्फ ओम रवींद्र पाटील याने दाखवलेल्या धाडसामुळे मोठी दुर्घटना टळली असून परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

गावाच्या उत्तरेला असलेल्या अनेर नदी पात्रात चार मुले खेळण्यासाठी गेली होती. खेळता खेळता पोहण्याचा मोह झाल्याने त्यांनी नदीत प्रवेश केला. मात्र पाण्याची खोली व प्रवाहाचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. याच वेळी तेथून घरी जात असलेल्या उमेशचे लक्ष या घटनेकडे गेले. प्रसंगावधान राखत त्याने क्षणाचाही विलंब न करता नदीत उडी घेतली आणि एकामागोमाग चारही मुलांना सुरक्षित बाहेर काढले.

उमेशने स्वताच्या जीवाची पर्वा न करता चारही मुलांना सुरक्षित काढण्यात त्याला यश आले हे विशेष. अन्यथा उमेशच्या जीवालाही धोका झाला असता.

उमेशच्या या धाडसी कृतीमुळे चार कुटुंबांवरील संकट टळले आहे. त्याचे वडील रवींद्र साहेबराव पाटील हे सालगडी म्हणून काम करत असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. अशा परिस्थितीतही उमेशने दाखवलेले धैर्य प्रेरणादायी ठरत आहे.

या घटनेनंतर गावकऱ्यांसह विविध सामाजिक संस्था व पदाधिकाऱ्यांनी उमेशचे कौतुक करून त्याचा सत्कार केला. तसेच त्याच्या या शौर्यपूर्ण कार्याची शासनाने दखल घेऊन सन्मान करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### हॉटेल चालकांकडून ११ सिलिंडर जप्त

**मलकापूर ।** घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर रोखण्याकरीता तालुकास्तरावर तहसीलदार समाधान सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली १० कर्मचाऱ्यांची समिती गठित करण्यात आली. दि.१७ मार्च रोजी समितीच्या वतीने शहरातील २० ते २२ हॉटेलांवर धाडी टाकण्यात आल्या. ११ ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा अवैधरित्या वापर सुरू असल्याने पुरवठा अधिकारी धनश्री हरणे, नायब तहसीलदार नामदेव राठोड यांनी सिलिडर जप्त केले.

## मेलाणे येथे अँग्रो क्रिकेट प्रीमियर लीग

प्रतिनिधी । चोपडा

**ग्रामीण व आदिवासी भागातील सुप्त क्रिकेट प्रतिभेला वाव मिळावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या याहा अँग्रो क्रिकेट प्रीमियर लीग मेलाणे (सीजन-०१) स्पर्धेचा नुकताच उत्साहात समारोप झाला. मएक गाव एक संघफ ही संकल्पना राबवत आयोजक करण पावरा यांनी या स्पर्धेद्वारे ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.**

शहरी भागापुरत्याच मर्यादित राहणाऱ्या क्रिकेट स्पर्धांमुळे दुर्गम आदिवासी पाड्यांतील खेळाडूंना संधी मिळत नाही, ही बाब लक्षात घेऊन या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परिणामी, अनेक गुणवंत खेळाडूंना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली आणि त्यांच्या खेळाची दखलही घेण्यात आली. स्पर्धेतील अंतिम सामना अत्यंत अटीतटीचा आणि रोमांचक ठरला. या लढतीत आयोजक याहा अँग्रो मेलाणे टीम युवा मेलाणे संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. विजेत्या संघाला सरपंच प्रताप खाज्या पावरा यांच्या हस्ते २१ हजार १ रुपयांचे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले. उपविजेता म्हणून बलवाडी संघानेही दमदार कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधले. या संघाला सभापती ताराचंद खुमान पावरा यांच्या हस्ते ११ हजार १ रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

या स्पर्धेमुळे आदिवासी पाड्यांवरील खेळाडूंची चमकदार कामगिरी सर्वांसमोर आली.

## पं.आप्पासाहेब जळगावकर संगीत महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**भारतीय शास्त्रीय संगीत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध संवादिनी वादक दिवंगत आप्पासाहेब जळगावकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिष्य परिवाराच्या वतीने संपूर्ण देशभर विविध संगीत महोत्सवाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.**




श्री.संत गजानन बहुद्देशीय संस्था चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित आप्पासाहेब जळगावकर संगीत महोत्सवाचे आयोजन मार्च २०२० रोजी आक्कासो.सौ शरच्चंद्रिका सुरेश पाटील नाट्यगृह येथे १८ वे पुष्प आयोजित करण्यात आले.

संगीत महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ.विकास हरताळकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी चोपडा पिपल्स बँकेचे चेअरमन चंद्रहास गुजराथी होते. प्रमुख अतिथी म्हणून शांताराम पाटील,हितेंद्र देशमुख, राजाराम पाटील उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष मनोज चित्रकथी, सचिव विजय पालीवाल, भागवत जाधव, सतीश पाटील, विवेक बाविस्कर, गोपाल निकम, निलेश कुंभार, गणेश कोळी, प्रेम वाघ, सुयश मगरे, पियुष पाटील आदींचे सहकार्य लाभले.

# अथक प्रयत्नाने यश मिळवणे सोपे मात्र यश टिकवणे, पचविणे कठीण

## पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्त प्रशांत बडगुजर यांच्या सत्कारप्रसंगी माधुरी मयुर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । चोपडा

**पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत उज्ज्वल यश मिळवलेले प्रशांत बडगुजर यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सचिव माधुरी मयूर यांनी सामान्य परिस्थितीतून असामान्य यश मिळवणे व या धावत्या जगात तेच यश टिकविणे तसेच कायमस्वरूपी पचविणे अत्यंत कठीण असल्याचे प्रतिपादन केले.**



एज्युकेशन सोसायटी संचलित प्रताप विद्यामंदिराचे माजी विद्यार्थी व नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत उज्ज्वल यशाचे मानकरी ठरलेले प्रशांत बडगुजर यांचा संस्था व शाळेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सचिव माधुरी मयूर यांनी पुढे सांगितले. निवडलेला सत्याचा व नैतिकतेचा मार्ग जरी खडतर असला तरी सदैव परिस्थितीची जाण व जबाबदारीचे भान आपण आदर्श म्हणून समोर ठेवले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष शैलाबेन मयूर, उपाध्यक्ष विश्वनाथ अग्रवाल, चेअरमन राजाभाई मयूर, संचालक चंद्रहार्स गुजराथी आदी उपस्थित होते.

## दहिवद येथे जिल्हा बँक फोडण्याचा प्रयत्न फसला

प्रतिनिधी । चाळीसगाव

**तालुक्यातील दहिवद येथे जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक फोडण्याचा प्रयत्न आज सोमवारी सकाळी उघडकीस आला. चोरट्यांनी बँकेतील तिजोरीचे कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न केला मात्र तो असफल ठरला. मात्र चोरट्यांनी बँकेतील ४ हजार रूपये किंमतीचे थिंकक्लाईट सीपीयू चोरून नेला आहे. याप्रकरणी मेहूणबारे पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

दहिवद येथे आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेची शाखा असून दि.२० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता बँकेला कुलूप लावून कर्मचारी घरी गेले. त्यानंतर सोमवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास शाखा व्यवस्थापक गौरव वसंतराव चौधरी यांना बँकेच्या शिपायाने फोन करून सांगितले की, दहिवद बँकेच्या शाखेच्या पुढील दरवाजाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत असून चोरीचा प्रयत्न झाला. मुख्य दरवाजातील लोखंडी दरवाजाला लावलेले कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. तिजोरीचे मुख्य दरवाजाचे कुलूप तोडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून आले.

## अमळनेर मराठा समाज मंडळाचा महिलादिन साजरा

प्रतिनिधी । अमळनेर



**मराठा समाज महिला मंडळाने ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर २२ मार्च रोजी महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे रेखा पाटील, संस्थापक अध्यक्ष तिलोत्तमा पाटील, संचालिका जयश्री पाटील, अध्यक्ष शीला पाटील व संचालिका यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.**

मतिलोत्तमा पाटील यांनी प्रास्ताविक मांडले ज्यात मंडळाच्या दहा वर्षाच्या प्रवासाचा आढावा घेण्यात आला व मराठा समाजातील महिलांना व्यासपीठ मिळावे , त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागावा या उद्देशाने मंडळाची स्थापना केल्याचे सांगितले .चोपडा येथील पंकज महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका

रेखाताई पाटील यांनी महिलांना उद्बोधन पर व्याख्यान दिले जात बदलत्या काळातील पालकांची जबाबदारी व मराठा समाजातील लग्न व्यवस्था या अनेक विषयावर त्यांनी उपस्थितना मार्गदर्शन केले. मंडळाच्या खजिनदार सौ.पद्मजा पाटील यांनी मागील वर्षाचा आर्थिक व कार्यक्रम अहवाल सादर केला. त्यानंतर यावर्षीच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली मंडळाचे अध्यक्ष म्हणून सौ सुलोचना पाटील यांची निवड करण्यात आली .